महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र : ०२२-२२८१०३९३
ई-मेल : desk4.labour-mh@gov.in

क्रमांक : एफएसी-२०२१/प्र.क्र.१४१/कामगार-४ दिनांक : २४ मे, २०२१.

तातडीचे

प्रति,

संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.

**विषय :-** कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने कारखानदारांना कामगारांच्या कामाचे तासांकरीता कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ५१,५२ ५४ आणि ५६ मधून सूट देणेबाबत...

**संदर्भ :-** १.श्री. सुदर्शन जैन, महासचिव, इंडियन फार्मास्युटीकल अलायन्स, यांनी मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांना पाठविलेले दि.२२.०४.२०२१ रोजीचे पत्र.
२.आपले क्र.संऔसुवआ/सूट/३६२०/१ दि.०७.०५.२०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये श्री.सुदर्शन जैन, महासचिव, इंडियन फार्मास्युटीकल अलायन्स, मुंबई यांनी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने कामगारांची उपलब्धता विचारात घेऊन फार्मास्युटीकल्स उद्योगातील कामगारांचे कामाचे तास वाढविण्याची विनंती केली आहे.याबाबत आपण संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये आपले अभिप्राय शासनास सादर केले आहेत.

२. सद्याची राज्यातील कोविड-१९ या संसर्गजन्य साथ रोगाची परिस्थिती विचारात घेऊन आपणांस असे कळविण्यात येते की,राज्य शासनास कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ६५(२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये राज्यातील ज्या कारखान्यांमध्ये कामगारांची कमतरता भासत असेल केवळ अशाच कारखान्यांना दिनांक ३०.०६.२०२१ पर्यत कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ६५(३) च्या अटींच्या अधीन राहून तसेच खाली विषद करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ५१,५२,५४ आणि ५६ मधून सूट देण्यात येते असून त्या कारखान्यांना उपलब्ध कामगारांकडून १२ तासांच्या दोन पाळयांमध्ये (Shifts)कारखाना चालविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सदर सूट कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ६५(३) च्या अटींच्या व खालील अटींच्या अधीन राहील.

- अतिकालीक कामाचे वेतन हे साधारण वेतनाच्या दुप्पट दराने दिले पाहिजे.
- कामगारांच्या कामाच्या वेळेतील बदलाचा रासायनिक किंवा इतर धोकादायक कारखान्यातील सुरक्षिततेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी भोगवटादाराची राहील.
- कोणत्याही दिवशी कामाचे तास १२ तासापेक्षा जास्त नसावेत.
- कोणत्याही दिवशी कामाचे तास हे विश्रांतीच्या वेळेसह १३ तासापेक्षा अधिक असू नयेत.
- कोणत्याही आठवडयात एकूण कामाचे तास ६० तासापेक्षा अधिक असू नयेत.
- कोणत्याही कामगारास सलग सात दिवस अतिकालिक काम देण्यात येऊ नये तसेच कोणत्याही तिमाहीत अतिकालिक कामांचे तास हे ११५ तासापेक्षा जास्त असू नयेत.
- कोरोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी कारखान्याच्या भोगवटादाराने आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली पाहिजे.
- कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेदरम्यान दोन कामगारामध्ये सुरक्षित अंतर ठेवावे व मास्कचा वापर अनिवार्य करावा. तसेच Covid-१९ Appropriate Behaviour राहील याची दक्षता घ्यावी.
- सटर सूट कालावधी दि.३०.०६.२०२१ पर्यंत कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ६४ मध्ये विनिर्दिष्टित केल्यानुसार समजण्यात यावा.

आपला,

(रा. शा. कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव अग्रेषित,**

मा. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

c:\users\mahesh.bedge\desktop\कार्यालयीन कामगारांना मुदतवाढ (२).docx